सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

सन १९०९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३

# छत्रपती शिवाजी महाराज वस्तू संग्रहालय अधिनियम, १९०९

(दिनांक ३१ ऑगस्ट, २००५ पर्यंत सुधारित)

## Bombay Act No. III of 1909

# THE CHHATRAPATI SHIVAJI MAHARAJ VASTU SANGRAHALAYA ACT, 1909

*(As modified upto the 31st August, 2005)*

*

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय आणि ग्रंथागार, नागपूर यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि
संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित.
२००६

( किंमत : रु. ४-०० )

# छत्रपती शिवाजी महाराज वस्तू संग्रहालय अधिनियम, १९०९

अनुक्रमणिका


१. संक्षिप्त नाव व प्रारंभ

२. मंडळाकडे निहित असलेली मालमत्ता

३. मंडळाची रचना व त्याचे अधिकार

३क पदावधि :

जर जागा रिक्त होईल तर नवीन सदस्यांची निवडणूक व नेमणूक

३ख संग्रहालयांतील वस्तु वापरण्यास देण्याचा, अदलाबदल करण्याचा किंवा नष्ट करण्याचा मंडळाचा अधिकार.

३ग मंडळाच्या मालकीचा नसलेला (वस्तू) संग्रह ठेवण्याचा मंडळाचा अधिकार

४. अधिकारी व सेवक हे लोकसेवक असणे

५. नियम

६. केन्द्र सरकार किंवा राज्य शासन किंवा व्यक्तीकडून कर्ज घेण्याचा अधिकार

७. स्थावर मालमत्ता किंवा उत्पन्न गहाण टाकणे

८. निक्षेप निधी बाबत तरतूद

९. निक्षेप निधीची वार्षिक तपासणी

१०. ऋणपत्रे देणे

११. ऋणपत्राचा नमुना

१२. चिकटविलेल्या पुरवणीदाखलच्या कागदावर शेरा लिहण्यास प्रतिबंध

१३. रोखा प्रमाणपत्र देणे

१४. ज्यांना संयुक्तपणे पैसे द्यावयाचे असतील त्यांच्यापैकी हयात राहिलेल्यास पैसे देणे

१५. संयुक्तपणे धारण करणारांपैकी एक किंवा अधिक व्यक्तींना पावती देण्याचा अधिकार

१६. विश्वस्तांची नोटीस स्वीकारण्याजोगी नसेल

१७. मंडळास नियम करण्याचा आधिकार आहे

अनुसूची

# सन १९०९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३[१]

## (छत्रपती शिवाजी महाराज वस्तू संग्रहालय अधिनियम, १९०९.)

(१९ ऑगस्ट १९०९)

ह्या अधिनियमांत पुढील आदेश व अधिनियम याअन्वये अनुकूलन, रुपभेद व सुधारणा करण्यात आल्या आहेत.—

सन १९१३ चा मुंबई अधिनियम ७.
सन १९२१ चा मुंबई अधिनियम ६.
सन १९२२ चा मुंबई अधिनियम १२.
सन १९२४ चा मुंबई अधिनियम ७.
सन १९३३ चा मुंबई अधिनियम १९.
भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेश.
विधी अनुकूलन आदेश, १९५०.
सन १९५४ चा मुंबई अधिनियम २४.
सन १९५४ चा मुंबई अधिनियम ४४.
मुंबई विधी अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९५६.
महाराष्ट्र विधी अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६०.
सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८.
सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९*
सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५.

**[२] [ छत्रपती शिवाजी महाराज वस्तू संग्रहालय ] बांधणे व त्याची व्यवस्था याची तरतूद करणारा अधिनियम**

**ज्याअर्थी,** हिज रॉयल हायनेस प्रिन्स ऑफ वेल्स यांनी १९०५ साली मुंबईस दिलेल्या भेटीचे स्मारक म्हणून मुंबई येथे एक पदार्थ-संग्रहालय बांधण्याचा व त्याची व्यवस्था ठेवण्याचा उद्देश आहे;

**आणि ज्याअर्थी,** ह्या कारणांसाठी विवक्षित जमीन निराळी ठेवली आहे आणि पैशाच्या मोठमोठ्या रकमा ह्या कारणासाठी दिल्या आहेत व देण्यात येत आहेत;

---

१. उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी मुंबई राजपत्र, १९०८ भाग-सात, पृष्ठ १७१(इं) पहा. निवड समितीच्या अहवालाकरिता वरीलप्रमाणे १९०९, भाग-सात, पृष्ठ ९१ (इं) आणि समितीतील कामकाजाकरिता वरीलप्रमाणे १९०९, भाग सात, पृष्ठ ३६ व १६८ (इंग्रजी) पहा.

२. सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम २ अन्वये "पश्चिम भारताचे प्रिन्स ऑफ वेल्स पदार्थ-संग्रहालय" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

* सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९ याचे कलम ३ पुढील प्रमाणे वाचावे.

"मुख्य अधिनियमाच्या कलम ३ अन्वये रचना करण्यात आलेली जी एकव्यक्तिभूत संस्था "पश्चिम भारताच्या प्रिन्स ऑफ वेल्स पदार्थ संग्रहालयाचे विश्वस्त" या नावाने ओळखण्यात येते तिच्या विश्वस्त मंडळाचा जो सदस्य आहे अशा, "प्राचार्य सर जमशेठजी जीजीभॉय कला शाळा" यांच्या पदनामात बदल केल्यामुळे मंडळाच्या रचनेवर किंवा मंडळाच्या शक्तीवर परिणाम होणार नाही, आणि अशा रीतीने केव्हाही परिणाम झाल्याचे समजण्यात येणार नाही; आणि या अधिनियमाच्या प्रारंभाच्या निकटपूर्वी, रचना केल्याप्रमाणेच्या मंडळाने केलेली सर्व कृत्ये व त्याच्या शक्ती, या अधिनियमाच्या प्रारंभानंतर रचना केल्याप्रमाणेच्या मंडळाची कृत्ये व शक्ती असल्याचे समजण्यात येईल."

पदनामातील बदलामुळे, कलम ३ अन्वये रचना करण्यात आलेल्या मंडळाने केलेली कृत्ये व त्यांच्या शक्ती यावर परिणाम न होणे.

**आणि ज्याअर्थी,** उक्त रकमा अभिरक्षेत ठेवण्यासाठी तीन विश्वस्त तात्पुरते नेमण्यात आलेले आहेत;

**आणि ज्याअर्थी,** पदार्थ-संग्रहालय बांधण्याची, ते चालू ठेवण्यासाठी व त्याची व्यवस्था ठेवण्यासाठी आणि उक्त जमीन व पैसा निहित करण्यासाठी व त्याच्या व्यवस्थेसाठी आणि कायम स्वरुपाच्या विश्वस्त मंडळाची नेमणूक करण्यासाठी तरतूद करणे इष्ट आहे;

**त्याअर्थी,** याअन्वये पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात आला आहे.

**१.** (१) या अधिनियमास [१][ छत्रपती शिवाजी महाराज वस्तू संग्रहालय ] अधिनियम, १९०९ असे म्हणावे आणि संक्षिप्त नाव व प्रारंभ.

(२) तो ताबडतोब अंमलांत येईल.

**२.** ह्या अधिनियमास दिलेल्या अनुसूचीत निर्दिष्ट केलेल्या जमिनीतील व जमिनीवरील [२][ शासनाचे ] सर्व हक्क, मालकी हक्क व हितसंबंध यांसहित आणि हिज रॉयेल हायनेस दी प्रिन्स ऑफ वेल्स यांनी सन १९०५ साली मुंबईस दिलेल्या भेटीचे स्मारक म्हणून मुंबई येथे एक पदार्थ-संग्रहालय बांधण्याच्या व ते ठेवण्याच्या कारणासाठी वर्गणी म्हणून दिलेला पैसा अभिरक्षेत ठेवण्यासाठी जे तीन विश्वस्त तात्पुरते नेमलेले आहेत त्या विश्वस्तांच्या सध्या अभिरक्षेत असलेला सर्व पैसा, आणि जी इतर सर्व मालमत्ता मग ती स्थावर किंवा जंगम असो– उक्त कारणासाठी दिलेली, मृत्यूपत्रान्वये दिलेली, हस्तांतरित केलेली किंवा अन्य रीतीने संपादन केलेली किंवा जी यानंतर देण्यात येईल, मृत्यूपत्रान्वये देण्यात येईल, हस्तांतरित करण्यात येईल किंवा अन्य रीतीने मिळेल अशी सर्व मालमत्ता ही, ह्या अधिनियमान्वये स्थापन केलेल्या विश्वस्त मंडळामध्ये, उक्त अनुसूचीत निर्दिष्ट केलेल्या जमिनीवर "[३][छत्रपती शिवाजी महाराज वस्तू संग्रहालय ]"या नावाचे एक पदार्थ-संग्रहालय बांधण्यासाठी आणि उक्त जमीन व पदार्थ-संग्रहालय ठेवण्यासाठी व त्याच्या व्यवस्थेसाठी, विश्वस्त म्हणून, निहित होईल.

(मंडळामध्ये निहित असलेली मालमत्ता.)

**३.** (१) ह्या अधिनियमाच्या कारणासाठी "[४][छत्रपती शिवाजी महाराज वस्तू संग्रहालयाचे ] विश्वस्त" या नावाच्या एका कायम स्वरुपाच्या मंडळाची स्थापना करण्यात येईल; आणि असे मंडळ (ज्याचा यानंतर, मंडळ म्हणून उल्लेख करण्यात आला आहे) हे एक व्यक्तिभूत संस्था म्हणून असेल; त्याची परंपरा अखंड असेल व त्याचा एक सामाईक शिक्का असेल आणि "[४][छत्रपती शिवाजी महाराज वस्तू संग्रहालयाचे ] विश्वस्त" या नावाने दावा लावता येईल तसेच त्या नावाने त्याच्यावर दाव लावता येईल, आणि [५][त्याला जंगम किंवा स्थावर मालमत्ता संपादन करण्याचा व धारण करण्याचा अधिकार असेल; तसेच त्याच्यामध्ये निहित असलेली कोणतीही स्थावर मालमत्ता भाड्याने देण्याचा, पट्ट्याने देण्याचा किंवा गहाण ठेवण्याचा ] करार करण्याचा आणि ह्या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता आवश्यक असलेली व सुसंगत असलेली सर्व कामे करण्याचा अधिकार असेल;

(मंडळाची रचना व त्याचे अधिकार.)

[६][ परंतु , उक्त मंडळास, अनुसूचीमध्ये निर्दिष्ट केलेली व सध्याच्या पदार्थ-संग्रहालयाच्या इमारतीच्या समोरील कोपऱ्यातील मनोऱ्याच्या जोत्यावरुन समांतर व त्यापासून २० फूट अंतरावर काढलेल्या व राम्पार्ट रोच्या सीमेपासून एस्प्लेनेड रोडच्या सीमेपर्यंत पोहचणाऱ्या रेषेत अंतर्भूत होणारी जमीन जिचे क्षेत्रफळ मोजणीप्रमाणे १४,६०६ चौरस यार्ड आहे– मग ते तितकेच असो किंवा थोडे कमी जास्त असो आणि अधिक स्पष्टीकरणासाठी, प्रिन्स ऑफ वेल्स पदार्थ-संग्रहालय (सुधारणा) अधिनियम, १९१३ कलम २ मध्ये उल्लेख केलेल्या नकाशात जिचे वर्णन केले आहे अशी जमीन किंवा त्यावरील इमारत गहाण टाकण्याचा अधिकार असणार नाही. ]

---

[१]. वरील अधिनियमाच्या कलम ३ अन्वये प्रिन्स ऑफ वेल्स पदार्थ संग्रहालय या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२]. विधी अनुकूलन आदेश, १९५० याद्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३]. सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम ४ अन्वये "पश्चिम भारताचे प्रिन्स ऑफ वेल्स पदार्थ-संग्रहालय (म्युझियम)" या मजकूरा ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४]. वरील अधिनियमाच्या कलम ५ (क) अन्वये पश्चिम भारताचे प्रिन्स ऑफ वेल्स पदार्थ संग्रहालयाचे हा मजकूर ज्या दोन ठिकाणी आलेला आहे त्या दोन्ही ठिकाणी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५]. प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम (सुधारणा) अधिनियम, १९२१ (१९२१ चा मुंबई ६) याच्या कलम २(अ) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६]. वरील अधिनियमाच्या कलम २ (ब) द्वारे हे परंतुक दाखल करण्यात आले.

(२) मंडळात पुढील सदस्य असतील :—

(क) [१] * * * * *

(ख) मुंबईचे कलेक्टर;

[२][(ख-१) कला संचालक, महाराष्ट्र राज्य; ]

[३][(ग) अधिष्ठाता, सर जमशेठजी जीजीभॉय कला शाळा; ]

[४][(ग-१) संचालक, पुरातत्वशास्त्र व वस्तू संग्रहालय, महाराष्ट्र राज्य; ]

[५][(घ) पुराणवस्तुशास्त्र विभाग, पश्चिम मंडळ, यांचे अधीक्षक; ]

(घघ) पुराणवस्तुशास्त्र विभाग, नैऋत्य मंडळ याचे अधीक्षक;

(ङ) मुंबई महानगरपालिकेने याबाबतीत वेळोवेळी केलेल्या विनियमानुसार, उक्त महानगरपालिका वेळोवेळी निवडून देईल असे मुंबई महानगरपालिकेचे दोन सदस्यः

परंतु निवडणूक ही [६][गुप्तमतदान ] पध्दतीने झाली पाहिजे;

(च) [७][राज्य] [८][सरकारकडून]नामनिर्दिष्ट करण्यात येतील असे तीन इतर व्यक्ती ; ]

(छ) [९][मुंबईच्या सृष्टिविज्ञान संस्थेने (नॅचरल हिस्ट्री सोसायटीने) पदार्थ संग्रहालयात संग्रह ठेवला असेल त्या मुदतीपर्यंत मुंबईच्या प्राणिशास्त्र संस्थेच्या व्यवस्थापक समितीने नामनिर्दिष्ट केलेले इतर दोन इसम; ]

(ज) रॉयल एशियाटिक सोसायटीच्या मुंबईच्या शाखेने वापरण्यासाठी म्हणून दिलेला पदार्थ-संग्रह पदार्थ-संग्रहालयात राहील तोपर्यंत उक्त संस्थेच्या शाखेने नामनिर्दिष्ट करावयाचा इतर एक इसम;

---

१ सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८ याच्या कलम २ द्वारे खंड (क) वगळण्यात आले.

उक्त अधिनियमाचे कलम ३ पुढीलप्रमाणे वाचावे :

बचाव : ३. मुख्य अधिनियमाच्या कलम ३ अन्वये एकव्यक्तिभूत संस्था म्हणून स्थापन केलेली व "पश्चिम भारताच्या प्रिन्स ऑफ वेल्स पदार्थ-संग्रहालयाचे विश्वस्त" या नावाने ओळखण्यात येत असलेल्या विश्वस्त उद्योग संचालकास वगळल्यामुळे अशा मंडळाच्या रचनेस किंवा अधिकारास बाध येणार नाही; आणि या अधिनियमाच्या प्रारंभाच्या निकटपूर्वी रचना करण्यात आल्याप्रमाणे असलेल्या मंडळाची सर्व कामे व अधिकार ही हा अधिनियम अंमलात आल्यावर स्थापन करण्यात आलेल्या मंडळाची कामे व अधिकार आहेत असे समजले पाहिजे.

२ सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९ याच्या कलम २(अ) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

३ वरील अधिनियमाच्या कलम (२ब) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला आणि तो दि. २४ ऑक्टोबर १९५० पासून अंमलात येईल.

४ सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम ५ (ख) द्वारे कलम (ग-१) दाखल करण्यात आले.

५ सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४४ याच्या कलम २ द्वारे खंड (ङ) ऐवजी हे खंड दाखल करण्यात आले.

६ सन १९२२ चा मुंबई १२ याच्या कलम २ द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

७ वरील अधिनियमाच्या कलम २ द्वारे हे खंड जादा दाखल करण्यात आले.

८ भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाद्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

९ प्रिन्स ऑफ वेल्स म्यूझियम (सुधारणा) अधिनियम, १९२२ (१९२२ चा मुंबई १२) द्वारे हे खंड समाविष्ट करण्यात आले.

[१][(जज) दिनांक ११ मार्च १९३२ रोजीच्या विश्वस्त व्यवस्था लेखावरुन रचना केलेल्या सर दोराबजी टाटा विश्वस्त व्यवस्था यांच्या विश्वस्तांच्या आणि सर रतन टाटा यांच्या अनुक्रमे दिनांक २१ मार्च १९१३ व दिनांक २९ फेब्रुवारी १९१६ रोजींच्या मृत्युपत्रावरुन व मृत्युपत्राच्या पुरवणीवरुन रचना करण्यांत आलेल्या सर रतन टाटा चारिटीजच्या विश्वस्ताच्या संयुक्त सभेत, हजर असलेल्या व अशा सभेत मते देणाऱ्या विश्वस्ताच्या बहुमताने निवडलेला इतर एक इसम; अशा सभेत समान मते पडल्यास, उक्त सभेच्या सभापतीस निर्णायक मत देण्याचा अधिकार असेल.]

(झ) मुंबई विद्यापीठाच्या कार्यकारी मंडळाने (सिन्डिकेटने) नामनिर्दिष्ट केलेला इतर एक इसम; आणि

(ञ) मंडळाची तशी इच्छा असेल तर, मंडळास जी मुदत आवश्यक वाटेल अशा मुदतीपर्यंत मंडळाने नामनिर्दिष्ट केलेले इतर चार इसम.

(३) पदसिद्ध सदस्यांच्या बाबतीत, पोट-कलम (२) मध्ये उल्लेख केलेल्या पदापैकी कोणत्याहि पदाची कामे त्या त्या वेळी करण्याऱ्या इसमाने सदस्य म्हणून काम केले पाहिजे.

(४) मंडळाच्या सभेस हजर असणाऱ्या व मते देणाऱ्या सदस्यांपैकी बहुसंख्य सदस्यांनी केलेली सर्व कृत्ये ही, मंडळाची कृत्ये म्हणून समजण्यात आली पाहिजेत.

(५) मंडळाचे कोणतेही कृत्य हे, मंडळातील कोणतीही जागा रिक्त आहे किंवा मंडळाच्या रचनेत दोष आहे याच केवळ कारणामुळे, अवैध समजता कामा नये.

(६) मंडळास, त्यांचा चिटणीस म्हणून काम करण्यासाठी एखाद्या इसमाची नेमणूक करण्याचा अधिकार आहे.

(७) मंडळाच्या वतीने पैसे देण्यासाठी दिलेले आदेश हे, जर त्यावर दोन सदस्यांनी सही केली असेल व चिटणीसाने त्यावर खरेपणाबद्दल जोडसही केली असेल तर ते वाजवी रीतीने अभिप्रमाणिक असल्याचे समजण्यात आले पाहिजे.

पदावधि.

[२][**३-क.** (१) पदसिद्ध सदस्य खेरीज करुन मंडळाच्या सदस्यांनी, यामध्ये अन्य तरतूद केली असेल तर, तीन वर्षाच्या मुदतीपर्यंत पद धारण केले पाहिजे.

जर जागा रिक्त होईल तर नवीन सदस्यांची निवडणूक व नेमणूक.

(२) पदसिद्ध सदस्य खेरीज करुन, जर एखादा सदस्य—

(क) मरण पावेल, किंवा

(ख) लागोपाठ सहा महिन्यांपेक्षा अधिक मुदतीपर्यंत मंडळाच्या सभेत गैरहजर राहील, किंवा

(ग) लागोपाठ सहा महिन्यांपेक्षा अधिक मुदतीपर्यंत गैरहजर राहण्याच्या हेतूने [३][मुंबई इलाखा] सोडून जाईल, किंवा

(घ) कामातून मुक्त होण्याची इच्छा व्यक्त करील, किंवा

(ङ) काम करण्याचे नाकारील किंवा काम करण्यास असमर्थ होईल;

तर, ज्या सदस्याच्या जागी त्याची निवडणूक किंवा नेमणूक करावयाची असेल तो सदस्य ज्या रीतीने निवडण्यात किंवा नेमण्यात आला असेल त्याच रीतीने नवीन सदस्य, यथास्थिति, निवडण्याचा किंवा नेमण्याचा अधिकार आहे; आणि असा नवीन सदस्य जर अशी जागा रिक्त झाली नसती तर अशा सदस्याने ज्या मुदतीपर्यंत पद धारण केले असते त्या मुदतीपर्यंतच पद धारण करील.

---

[१] सन १९३३ चा मुंबई अधिनियम क्रमांक १९ याच्या कलम २ द्वारे खंड (जज) जादा दाखल करण्यात आले.

[२] प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम (सुधारणा) अधिनियम, १९२२ (१९२२ चा मुंबई १२) याद्वारे कलम ३क, ३ख व ३ग जादा दाखल करण्यात आले.

[३] विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

३-ख.[१] [[२][राज्य] सरकारने] याबाबतीत केलेल्या कोणत्याही नियमांच्या तरतुदीस अधीन राहून, मंडळास वेळोवेळी– संग्रहातील वस्तु वापरण्यास देण्याचा, अदलाबदल करण्याचा किंवा नष्ट करण्याचा मंडळाचा अधिकार.

(क) ह्या अधिनियमान्वये त्याच्यामध्ये निहित असलेल्या कोणत्याही संग्रहालयातील संपूर्ण वस्तू किंवा तिचा कोणताही भाग किंवा कोणतीही वस्तू कोणत्याही इसमास वापरण्यास देण्याचा;

(ख) अशा कोणत्याही संग्रहातील वस्तूंची अदलाबदल करण्याचा किंवा त्या विकण्याचा आणि अशा वस्तूंच्याऐवजी त्यांच्या मते पदार्थ-संग्रहालयात ज्या वस्तु ठेवण्यायोग्य असतील अशा वस्तू घेण्याचे किंवा विकत घेण्याचा;

(ग) अशा कोणत्याही संग्रहालयात असलेल्या वस्तू भारतातील किंवा इतर ठिकाणच्या दुसऱ्या पदार्थ-संग्रहालयास बक्षिस देण्याचा; आणि

(घ) अशा कोणत्याही संग्रहालयात असलेली कोणतीहि वस्तू काढून टाकण्याचा किंवा नष्ट करण्याचा;

अधिकार आहे :

परंतु, विश्वस्तास, जेव्हा यथास्थिति, वस्तू अशा रीतीने देणे, तिची अदलाबदल करणे, विक्री करणे, ती बक्षिस म्हणून देणे, काढून टाकणे किंवा नष्ट करणे यामुळे अशी कोणतीही वस्तू विश्वस्तांना ज्या शर्तीवर मिळाली असेल त्या शर्तीस प्रतिबंध होत असेल तेव्हा, कोणतीहि वस्तू देण्याचा, तिची अदलाबदल करण्याचा, ती विकण्याचा, बक्षिस देण्याचा, काढून टाकण्याचा किंवा ती नष्ट करण्याचा, अधिकार यातील कोणत्याही तरतुदीमुळे मिळणार नाही.

**३-ग.** यांत यापूर्वी काहीही असले तरी, मंडळास, जर त्यास योग्य वाटेल तर, ह्या अधिनियमान्वयेच्या त्यांच्या विश्वस्त व्यवस्थेच्या कारणासाठी, जो संग्रह मंडळाची मालमत्ता नाही असा संग्रह अभिरक्षेत घेण्याचा व त्याची व्यवस्था ठेवण्याचा आणि असा संग्रह पदार्थ-संग्रहालयांत किंवा इतर ठिकाणी ठेवण्याचा व तो सुस्थितीत ठेवण्याचा अधिकार आहे.] मंडळाच्या मालकीचा नसलेला (वस्तू) संग्रह ठेवण्याचा मंडळाचा अधिकार.

४. मंडळाने कामावर नेमलेले सर्व अधिकारी व सेवक हे, भारतीय दंड संहितेच्या अर्थानुसार लोक सेवक आहेत असे समजण्यात आले पाहिजे : अधिकारी व सेवक हे लोकसेवक असणे.

परंतु, हे कलम मंडळाने नेमलेल्या कोणत्याही मक्तेदाराच्या सेवेतील इसमास लागू होणार नाही.

५. (१)[१] [[२][राज्य] सरकारास] ह्या अधिनियमाचे हेतू अंमलात आणण्यासाठी नियम करण्याचा अधिकार आहे. नियम.

(२) विशेषकरुन व उपरिनिर्दिष्ट अधिकाराच्या सामान्यतेस बाध न येऊ देता अशा नियमात पुढील गोष्टींची तरतूद करण्याचा अधिकार आहे :—

(क) मंडळाच्या सभा ज्या रीतीने बोलवावयाच्या ती रीत, सभेचे कामकाज चालविण्यासाठी आवश्यक असलेली गणपूर्ति आणि अशा सभेतील कामकाज;

(ख) मंडळाच्या समित्यांची नेमणूक व अशा समितीकडे सोपविता येतील असे खर्च व नियंत्रण याबाबतीतील अधिकार;

---

१. भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाद्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. विधि अनुकूलन आदेश, १९९० द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

(ग) ह्या अधिनियमाच्या अनुसूचीमध्ये निर्दिष्ट केलेल्या जमिनीवर पदार्थ संग्रहालय बांधणे आणि उक्त जमीन व पदार्थ संग्रहालय ठेवणे व त्याची व्यवस्था, पदार्थ संग्रहालयात ठेवलेल्या वस्तूंची काळजी घेणे व त्या अभिरक्षेत ठेवणे आणि ज्या शर्तीअन्वये जनतेस जमिनीवर व पदार्थ संग्रहालयात जाता येईल त्या शर्ती ;

(घ) मंडळामध्ये निहित असलेली इतर कोणतीही स्थावर मालमत्ता ठेवणे, तिची व्यवस्था व तिची विल्हेवाट लावणे आणि मंडळाचा निधी सरकारी कर्जरोख्यात किंवा इतर प्रकारे गुंतविणे किंवा परत गुंतविणे आणि मंडळाचा निधी सुरक्षितपणे अभिरक्षेत ठेवणे;

(ङ) मंडळाने ठेवावयाच्या हिशेबांचा नमुना आणि असे हिशोब तपासणे व प्रसिद्ध करणे; आणि

(च) सरकारच्या असैनिकी सेवकास किंवा अशा असैनिकी सेवकाच्या कोणत्याही वर्गास जे नियम लागू असतील ते मंडळाने नेमलेल्या अधिकाऱ्यांना व सेवकांना लागू करणे;

[१][(छ) मंडळाने नेमलेल्या अधिकाऱ्यांच्या व सेवकांच्या फायद्यासाठी मंडळाने स्थापन केलेल्या कोणत्याही भविष्य निधीसाठी, मंडळ वेळोवेळी विहित करील अशा दराने व अशा शर्तीस अधीन राहून अंशदाने देणे.]

केंद्र सरकार किंवा [५][राज्य] सरकार किंवा इसमांकडून कर्ज घेण्याचा अधिकार.

[२][६. मंडळास, ह्या अधिनियमाचे हेतू अंमलात आणण्यासाठी त्यांना आलेला किंवा येणारा खर्च भागविण्याच्या कारणांसाठी किंवा यानंतर मंडळाने कर्जाऊ घेतलेल्या किंवा मंडळास देणे असलेल्या कोणत्याही रकमांची संपूर्णतः किंवा अंशतः परतफेड करण्याच्या कारणांसाठी आवश्यक असलेली कोणतीही रक्कम, [३][केंद्र किंवा [५][राज्य] सरकार] यांजकडून किंवा [४][ [५][राज्य] सरकारची] आगाऊ मंजुरी घेऊन कोणत्याही इसमाकडून कर्जाऊ घेण्याचा किंवा पुन्हा कर्जाऊ घेण्याचा आणि व्याजाने घेण्याचा अधिकार आहे.

[६] * * * * *

स्थावर मालमत्ता किंवा उत्पन्न गहाण टाकणे.

७. (१) मंडळास, कलम ३ च्या परंतुकात उल्लेख केलेल्या मालमत्तेखेरीज करून, त्याच्यामध्ये निहित असलेली कोणत्याही स्थावर मालमत्तेच्या किंवा त्यांच्या उत्पन्नाच्या तारणावर किंवा ह्या दोन्ही तारणावर, वर निर्दिष्ट केल्याप्रमाणेची, अशी कोणतीही रक्कम कर्जाऊ घेण्याचा किंवा पुन्हा कर्जाऊ घेण्याचा अधिकार आहे.

(२) मंडळास, अशा रीतीने कर्जाऊ घेतलेली कोणतीही रक्कम व त्यावरील व्याज यांच्या परतफेडीची हमी देण्याच्या कारणांसाठी, ज्या इसमाकडून किंवा ज्या इसमाचे वतीने अशी रक्कम मिळाली असेल अशा इसमाकडे अशी कोणतीही स्थावर मालमत्ता किंवा ह्या दोन्ही तारणांपासून मिळणारे उत्पन्न गहाण टाकण्याचा अधिकार आहे.

निक्षेप निधीबाबत तरतूद.

८. (१) मंडळाने एक वर्षापेक्षा अधिक मुदतीसाठी काढलेल्या प्रत्येक कर्जाच्या बाबतीत, मंडळाने कर्जाऊ घेतलेल्या रकमांची फेड एकतर मुद्दलाच्या किंवा मुद्दल व व्याज याच्या समान वार्षिक किंवा सहामाही हप्त्याने केली पाहिजेत किंवा त्यांनी दरवर्षी निक्षेप निधी म्हणून अशी रक्कम किंवा रकमा बाजूस ठेवल्या पाहिजेत किंवा ज्या सरकारी तारणपत्रात किंवा ह्या बाबतीत [४][[५][राज्य] सरकार] पसंत करील अशा इतर तारणपत्रात गुंतवून त्या चक्रवाढ व्याजाने जमा केल्या असता अशा रीतीने चक्रव्याज व्याजाने साचलेली रक्कम ही, सर्व खर्च दिल्यानंतर, प्रत्येक बाबतीत [४][[५][राज्य] सरकार] निदेश देईल [७][अशा साठ वर्षांहून अधिक नसलेल्या मुदतीत] अशा रीतीने कर्जाऊ घेतलेला पैसा फेडण्यास पुरेशा होतील.

---

[१] सन १९२४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७ यांच्या कलम २ (१) द्वारे खंड (छ) जादा दाखल करण्यात आले. यासंबंधी मंडळाने निश्चित केलेल्या दिनांकापासून हे खंड अंमलात येईल. वरील अधिनियमाचे कलम २ (२) पहा.

[२] प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम (सुधारणा) अधिनियम, १९२१ (१९२१ चा मुंबई ६) याद्वारे कलम ६ ते १७ दाखल करण्यात आले.

[३] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाद्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] वरील आदेशाद्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाद्वारे हे परंतुक वगळण्यात आले.

[७] प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम (सुधारणा) अधिनियम, १९२२ (१९२२ चा मुंबई १२) याच्या कलम ५ द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

(२) मंडळास, ह्या कलमान्वये बाजूस काढून ठेवलेल्या संपूर्ण निक्षेप निधीचा किंवा त्याच्या कोणत्याही भागाचा विनियोग उक्त निधी ज्या कर्जाच्या फेडीसाठी स्थापन करण्यात आला असेल ते कर्ज फेडण्याकडे कोणत्याही वेळी करण्याचा अधिकार आहे :

परंतु , अशा रीतीने विनियोग केलेल्या निक्षेप निधीच्या किंवा त्याच्या भागाच्या संबंधात मंडळास जे व्याज मिळाले असते ते व्याज त्याने निधीत जमा केले पाहिजे आणि कर्जाऊ घेतलेली सर्व रक्कम फेडण्यात येईपर्यंत, अशा रीतीने जेवढे व्याज मिळाले असते तेवढी रक्कम जमा केली पाहिजे.

निक्षेप निधीची वार्षिक तपासणी.

**९.** कोणत्याही कर्जाच्या फेडीसाठी स्थापन केलेला निक्षेप निधी हा [१][महाराष्ट्राच्या महालेखापालाने] दरवर्षी करावयाच्या तपासणीस अधीन असेल व त्याने, निधीच्या खाती जमा असलेली रोकड रक्कम व तारणपत्रांची किंमत याची रक्कम, जर रक्कम नियमितपणे गुंतविली असती व सुरुवातीस ज्या व्याजाच्या दराचा अंदाज केला होता तो व्याजाचा दर मिळाला असता तर जी रक्कम जमा झाली असती त्या रकमे बरोबर आहे किंवा कसे ह्याबद्दल खात्री करुन घेतली पाहिजे. मंडळाने [२][ [३][राज्य] सरकार] रकमेची हळूहळू पुन्हा जुळवणी करण्याबद्दल मंजुरी देईल ते खेरीजकरुन, जी रक्कम कमी असल्याबद्दल महालेखापाल प्रमाणपत्र देईल अशी कोणतीही रक्कम निक्षेप निधीत भरली पाहिजे.

ऋणपत्रे देणे.

**१०.** (१) ह्या अधिनियमान्वये जो निक्षेप निधी सरकारी तारणपत्रांत किंवा याबाबतीत [२][ [३][राज्य] सरकार] पसंत करील अशा इतर कोणत्याही तारणपत्रात गुंतविण्याबद्दल मंडळास निदेश देण्यात आला आहे किंवा तशा रीतीने गुंतविण्याचा मंडळास अधिकार आहे अशा कोणत्याही निक्षेप निधीच्या बाबतीत, मंडळाने, ज्या कर्जासाठी [२][ [३][राज्य] सरकारची] मंजुरी योग्यरीतीने मिळविण्यांत आली असेल अशा कोणत्याही कर्जाबद्दल काढावयाची कोणतीही ऋणपत्रे अशा कोणत्याही प्रकारे गुंतविण्याच्या कारणांसाठी, राखूण ठेवणे व बाजूला काढून ठेवणे हे विधिसंमत असेल, परंतु , अशी ऋणपत्रे अशारीतीने राखून ठेवण्याचा व बाजूस काढून ठेवण्याचा उद्देश, कर्ज उभारण्याची शर्त म्हणून अधिसूचित करण्यात आला पाहिजे.

(२) " पश्चिम भारताचे प्रिन्स ऑफ वेल्स पदार्थ-संग्रहालय " [४][किंवा यथास्थिती, छत्रपती शिवाजी महाराज वस्तू संग्रहालयाच्या विश्वस्तांना] प्रत्यक्षपणे व या नावाने अशी कोणतीही ऋणपत्र काढल्यामुळे अशी ऋणपत्रे बुडणार नाहीत किंवा ती रद्द होणार नाहीतः परंतु , अशा रीतीने काढलेले प्रत्येक ऋणपत्र हे जणू ते इतर कोणत्याही व्यक्तीस दिल्याप्रमाणे व त्याच्या नावाने काढलेले असल्याप्रमाणे सर्व बाबतीत वैध असेल.

(३) मंडळाने काढलेले कोणतेही ऋणपत्र, मंडळाने खरेदी केल्यामुळे किंवा मंडळाच्या नावे हस्तांतरित किंवा अभिहस्तांकित केल्यामुळे किंवा मंडळाच्या नावाचा शेरा लिहून दिल्यामुळे असे कोणतेही ऋणपत्र बुडणार नाही किंवा ते रद्द होणार नाही परंतु ते, जणू दुसऱ्या कोणत्याही इसमाने धारण केले असल्याप्रमाणे किंवा त्यात हस्तांतरित, अभिहस्तांकित केलेले असल्याप्रमाणे किंवा त्याच्या नावे शेरा लिहून दिलेला असल्याप्रमाणे त्याच रीतीने व त्याच मर्यादेपर्यंत, वैध व बेचनीय असेल.

ऋणपत्राचा नमुना.

**११.** (१) जेव्हा मंडळ ऋणपत्रे काढून पैसा उभारील तेव्हा ऋणपत्रे ही [२][ [३][राज्य] सरकारची] आगाऊ परवानगी घेऊन, मंडळ वेळोवेळी ठरवील अशा नमुन्यात असली पाहिजेत.

(२) ह्या कलमान्वये योग्यरीतीने अधिकृत केलेल्या कोणत्याही नमुन्यातील कोणतेही ऋणपत्र धारण करणारास, मंडळ वेळोवेळी ठरवील अशा शर्तीवर, अशा ऋणपत्रांच्या ऐवजी, मंडळाने अधिकृत केलेल्या इतर कोणत्याही नमुन्यातील ऋणपत्र घेण्याचा अधिकार आहे.

---

[१] महाराष्ट्र विधी अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाद्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] विधी अनुकूलन आदेश, १९५० द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम ६ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

(३) मंडळाने काढलेले प्रत्येक ऋणपत्र हे त्यावर शेरा लिहून हस्तांतरित करता येईल.

(४) अशा कोणत्याही ऋणपत्राने जी रक्कम मिळण्यासंबंधी हमी देण्यात आली असेल ती मिळण्याचा व त्याबाबतीत दावा करण्याचा हक्क अशा ऋणपत्रांपैकी काही ऋणपत्रे इतरांपेक्षा आधीच्या तारखेची असल्याच्या कारणांमुळे त्यास अग्रमान्यता न देता, त्या त्या वेळी उक्त ऋणपत्रे धारण करणारांकडे अनुक्रमे राहील.

*चिकटविलेल्या पुरवणी दाखल्याच्या कागदावर शेरा लिहिण्यास प्रतिबंध*

**१२.** बेचनीय दस्तऐवज अधिनियम, १८८१ च्या कलम १५ मध्ये काहीही असले तरी, ह्या अधिनियमाच्या तरतुदी, अन्वये दिलेले व शेरा लिहून हस्तांतरित करता येण्याजोगे कोणतेही ऋणपत्र धारण करणारा इसम, बेचन करण्याच्या कारणांसाठी त्यावर तो सही करील तेव्हा, जर तो उक्त कारणासाठी आपली सही, ऋणपत्राच्या मागच्या बाजूस करण्याऐवजी, इतर जागी करील तर, त्याने ऋणपत्रावर शेरा लिहिला आहे असे समजता कामा नये किंवा तो त्यावर शेरा लिहणारा इसम आहे असे समजता कामा नये.

*रोखा प्रमाणपत्रे देणे*

**१३.** (१) मंडळास, स्वविवेकानुसार या अधिनियमाच्या तरतुदी अन्वयेची कोणतीही ऋणपत्रे देण्याचे वेळी किंवा ती चलनात असतांना कोणत्याही वेळी अशा कोणत्याही ऋणपत्राचे पैसे देणाराने किंवा ती धारण करणाराने अर्ज केल्यानंतर त्यास दिलेल्या किंवा त्याने धारण केलेल्या ऋणपत्रांचे ऐवजी, ज्या कर्जाच्या संबंधांत अशी ऋणपत्रे असतील अशा प्रत्येक कर्जाच्या बाबतीत, रोखा प्रमाणपत्राच्या स्वरुपातील प्रमाणपत्र देण्याचा अधिकार आहे; व असे प्रमाणपत्र [1][ [2][राज्य] सरकारची] आगाऊ परवानगी घेऊन मंडळ वेळोवेळी जो नमुना ठरवील त्या नमुन्यानुसार असले पाहिजे.

(२) रोखा प्रमाणपत्र धारण करणाराने अर्ज केल्यानंतर, मंडळाने ज्या कर्जाच्यासंबंधी असे रोखा प्रमाणपत्र असेल त्या कर्जाच्या संबंधातील ऋणपत्रात त्याचे रुपांतर केले पाहिजे.

*ज्यांना संयुक्तपणे पैसे द्यावयाचे असतील त्यांच्या पैकी हयात राहिलेल्यांना पैसे देणे.*

**१४.** (१) भारतीय करार अधिनियम, १८७२ च्या कलम ४५ मध्ये काहीही असले तरी, ह्या अधिनियमाच्या तरतुदीन्वये दिलेल्या कोणत्याही ऋणपत्राच्या किंवा कोणत्याही रोखा प्रमाणपत्राच्या बाबतीतील पैसा दोन किंवा अधिक व्यक्तीस संयुक्तपणे द्यावयाचा असेल आणि त्यापैकी एखाद्या किंवा कोणताही व्यक्ती मरण पावेल, तेव्हा उक्त पैसा उक्त व्यक्तीपैकी हयात असलेल्या व्यक्तीस किंवा व्यक्तीस दिला पाहिजे.

(२) मरण पावलेल्या व्यक्तींच्या प्रतिनिधीचा हयात असलेला किंवा हयात असलेले व्यक्तीस व मरण पावलेली व्यक्ती यांना संयुक्तपणे द्यावयाच्या पैशाचे संबंधात हयात असलेल्या व्यक्तीविरुध्द किंवा व्यक्तींविरुध्द जो कोणताही मागणीहक्क असेल त्यास यातील कोणत्याही तरतुदीमुळे बाध येणार नाही.

*संयुक्तपणे धारण करणाऱ्या पैकी एक किंवा अधिक व्यक्तीस पावती देण्याचा अधिकार*

**१५.** भारतीय करार अधिनियम, १८७२ च्या कलम ४५ मध्ये काहीही असले तरी, या अधिनियमाच्या उपबंधान्वये दिलेले कोणतेही ऋणपत्र किंवा कोणतेही प्रमाणपत्र जर दोन किंवा अधिक व्यक्ती धारण करीत असतील तर, उक्त व्यक्तीपैकी कोणत्याही व्यक्तीस, उक्त व्यक्तींपैकी कोणत्याही व्यक्तीने मंडळा विरुध्द नोटीस दिली नसेल तर, अशा ऋणपत्रांच्या किंवा रोखा प्रमाणपत्रांच्या बाबतीत मिळण्याजोग्या कोणत्याही व्याजाबद्दल किंवा लाभांशाबद्दल परिणामक्षम पावती देण्याचा अधिकार आहे.

*विश्वस्ताची नोटीस स्वीकारण्याजोगी नसेल.*

**१६.** मंडळाने काढलेल्या कोणत्याही ऋणपत्रांच्या किंवा रोखा प्रमाणपत्रांच्या बाबतीत कोणत्याही विश्वस्ताची कोणतीही नोटीस मंडळाने स्वीकारण्याजोगी असणार नाही.

---

[1] भारतीय विधी अनुकूलता परिषद आदेशाद्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

१७. (१) मंडळास, वेळोवेळी, पुढील गोष्टी विहित करण्यासंबंधी नियम करण्याचा अधिकार आहे :— मंडळास नियम करण्याचा अधिकार आहे.

(क) ज्या रकमांबदल ऋणपत्रे व रोखा प्रमाणपत्रे देण्यात येतील त्या रकमा ठरविणे;

(ख) ह्या अधिनियमाच्या तरतुदीअन्वये दिलेली सर्व ऋणपत्रे व रोखा प्रमाणपत्रे यांच्या बाबतीतील व्याज देण्याची, त्याची नोंद करण्याची व त्याची पावती देण्याची रीत ठरविणे ;

(ग) ज्या परिस्थितीत अशी ऋणपत्रे व रोखा प्रमाणपत्रे ही त्यावरील आणखी व्याज देण्याबद्दलची मागणी करण्यापूर्वी नवीन करून घेतली पाहिजेत ती परिस्थिती ;

(घ) नवीन केलेली ऋणपत्रे व रोखा प्रमाणपत्रे यांच्या बाबतीत बसवावयाची फी ;

(ङ) रोखा हस्तांतरित करताना, उपयोगात आणावयाचा नमुना, अनुसरावयाची रीत आणि त्यावर बसवावयाची फी ;

(च) नवीन करून मिळण्यासाठी दिलेली ऋणपत्रे व रोखा प्रमाणपत्रे यांच्या बाबतीतील पावती ज्या नमुन्यात दिली पाहिजे तो नमुना ;

(छ) ऋणपत्रे व रोखा प्रमाणपत्रे यांच्या दुसऱ्या प्रतीसाठी अर्ज करणाऱ्या व्यक्तींनी सादर करावयाचा पुरावा;

(ज) ऋणपत्रे व रोखा प्रमाणपत्रे ही संपूर्णतः किंवा अंशतः गहाळ झाली आहेत किंवा नष्ट झाली आहेत असे म्हणणे असेल त्याबाबतीत ज्या परिस्थितीत व ज्या रीतीने ऋणपत्रे व रोखा प्रमाणपत्रे यांची दुसरी प्रत देण्यात आली पाहिजे ती परिस्थिती व ती रीत ठरविणे व अशी ऋणपत्रे व रोखा प्रमाणपत्रे यांच्या बाबतीत ज्या मुदतीनंतर व्याज किंवा त्याच्या दुसऱ्या प्रती दिल्या पाहिजेत ती मुदत व ऋणपत्रे व रोखा प्रमाणपत्रे यांच्या दुसऱ्या प्रती देण्याच्या संबंधात बसवावयाची फी;

(झ) जी ऋणपत्रे संपूर्णतः किंवा अंशतः गहाळ झाली आहेत किंवा नष्ट झाली आहेत असे म्हणणे असेल अशा ऋणपत्रांवरील व्याज मिळण्याबद्दल अर्ज करणाऱ्या व्यक्तीने किंवा ऋणपत्रांची दुसरी प्रत मिळण्याबद्दल अर्ज करणाऱ्या व्यक्तीस द्यावयाच्या हमीचे स्वरूप व रक्कम ठरविणे;

(ण) सामान्यतः ह्या अधिनियमाचे हेतू अंमलात आणावयाच्या कारणांसाठी अंमलात आणावयाचे उपाय.

(२) (क) कोणताही नियम किंवा नियमांतील फेरफार किंवा नियम रद्द करणे ह्यास [१][ [२][राज्य] सरकारने] मंजुरी दिल्याशिवाय आणि अशी मंजुरी [३][राजपत्रांत] प्रसिध्द केली असल्याशिवाय अंमलात येणार नाही. कोणताही नियम करणे किंवा त्यात फेरफार करणे किंवा तो रद्द करणे ह्यास, ती गोष्ट उक्त राजपत्रांत लागोपाठ तीन आठवडे प्रसिध्द केलेली असल्याशिवाय [१][ [२][राज्य] सरकारने] मान्यता देता कामा नये.

(ख) [१][ [२][राज्य] सरकारने] उक्त राजपत्रात कोणत्याही वेळी अधिसूचना प्रसिध्द करून, ह्या कलमाच्या तरतुदीअन्वये प्रसिध्द केलेला कोणताही नियम रद्द करणे हे विधिसंमत असेल.]

---

१. भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेश याद्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. विधी अनुकूलन आदेश, १९५० द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. मुंबई विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९५६ द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

कोणताही अधिनियम किंवा लेख इत्यादीमधील संदर्भाचा अन्वयार्थ लावणे.

[1][ १८. प्रिन्स ऑफ वेल्स " पदार्थ संग्रहालय " (सुधारणा) अधिनियम, २००१ हा अंमलात आल्यावर इतर कोणत्याही अधिनियमामधील किंवा कोणत्याही अधिनियमाअन्वये केलेल्या नियमांमधील, विनियमांमधील, उप-विधींमधील, किंवा काढलेल्या अधिसूचनांमधील किंवा आदेशांमधील किंवा त्याच्या मूळ नावाने असलेल्या कोणत्याही लेखामधील, दस्तऐवजामधील किंवा कार्यवाहीमधील, "प्रिन्स ऑफ वेल्स पदार्थ संग्रहालयाचा" कोणताही संदर्भ, संदर्भानुसार त्यास दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, तो "छत्रपती शिवाजी महाराज वस्तू संग्रहालयाचा (म्युझियम)" संदर्भ असल्याचे मानण्यात येईल व त्यानुसार त्याचा अन्वयार्थ लावण्यात येईल.]

## * अनुसूची [2]

सेलर्स होम व एल्फिस्टन कॉलेज यांच्या समोर असलेला व ज्याच्या उत्तरेस रॅमपार्ट रो आहे व ज्याचे क्षेत्रफळ ३१,९५७ चौरस यार्ड किंवा जवळ जवळ तेवढे आहे आणि ज्याचा सर्व्हे नंबर, मुंबई शहराचा सर्व्हे नंबर ८४३३ आहे असा जमिनीचा अर्धवर्तुळाकार भाग.

---

[1] सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम ७ अन्वये कलम १८ समाविष्ट करण्यात आले.

[2] प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम (सुधारणा) अधिनियम, १९१३ (१९१३ चा मुंबई ७) द्वारे ही अनुसूची सुधारित करण्यात आली.

* वरील अधिनियमाद्वारे या अनुसूची समाविष्ट असलेल्या क्षेत्रातून काही क्षेत्र वगळण्यात आले.

शासकीय मुद्रणालय, नागपूर येथे मुद्रित